| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५३ /२०२४ दि. ३१/०८/२०२४

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA मार्फत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. कंपनी कडून मुंबई मेट्रो ४ चे काम करण्यात येणार आहे. सदर मेट्रो ४ चे पिलरवर **नागलाबंदर सिग्नल ते इंडियन ऑईल पंप दरम्यान आय व यु गर्डर** टाकतेवेळी ठाणे घोडबंदर वाहिनी जड अवजड वाहनांकरीता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** ठाणे घोडबंदर वाहिनीवरील गर्डरचे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **पिलर नं. ८५ जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाणे वजनकाटा जवळून सर्व्हिस रोड मार्गे पुढे इंडियन ऑईल पंपसमोर मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

०१) दि. ०२/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ०३/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०२) दि. ०४/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ०५/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०३) दि. ०६/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ०७/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०४) दि. ०८/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ०९/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०५) दि. १०/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ११/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०६) दि. १२/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १३/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०७) दि. १४/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १५/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०८) दि. १६/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १७/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
०९) दि. १८/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १९/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
१०) दि. २०/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २१/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
११) दि. २२/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २३/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
१२) दि. २४/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २५/०९/२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत

सदर वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान **आय व यु गर्डर** टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u> :—**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**<u>प्रत</u>** :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.